क्र.साप्रवि/रवका/न.क्र.६६४/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १०७ दिनांक १८/०५/२००७

विषय : १) नक्षलग्रस्त/अतिसंवेदनशील भागात कार्यरत असलेल्या आणि भाडे माफ निवासस्थानाची सुविधा उपलब्ध नसलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांना 'अनुज्ञाप्ती शुल्क' मासिक वेतनात लागू करणे.
२) शासनाने अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांना 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करणे.

संदर्भ : १) वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक १७/२/२००१ व दि. २१/९/२००६ .
२) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक ६/८/२००२
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि. २९/१/२००३
४) आदिवासी विभागाचा शासन निर्णय दि. ९/११/२००५
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.७६ दि. २०/११/२००६

-------

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी नक्षलग्रस्त/अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात कार्यरत असलेल्या ज्या कर्मचा-यांना भाडेमाफ निवासस्थानाची सुविधा उपलब्ध नाही अशा महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांना 'अनुज्ञाप्ती शुल्क' मासिक वेतनामध्ये लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव तसेच संदर्भिय क्र. ४ चा शासन निर्णय दि.०९/११/२००५ अन्वये 'अतिसंवेदनशील' म्हणून घोषित केलेल्या तालुक्यांतर्गत मुख्यालय असलेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांना दिनांक ०६/०८/२००२ पासून 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून उपरोक्त दोनही प्रस्तावांना खालीलप्रमाणे मान्यता दिली :-

**एक)** शासनाने नक्षलग्रस्त/अतिसंवेनदनशील म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्याच्या/तालुक्याच्या/गावाच्या ठिकाणी मुख्यालय असलेल्या व तेथे कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या ज्या कर्मचा-यांना भाडेमाफ निवासस्थानाची सुविधा उपलब्ध नाही फक्त अशाच कर्मचा-यांना, सदर जिल्हयाचे/तालुक्याचे/गावाचे ठिकाण शासनाने नक्षलग्रस्त/अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या तारखेपासून म्हणजेच 'प्रोत्साहन भत्ता' लागू केलेल्या तारखेपासून, सोबतच्या ' पूरकपत्र -ब' मध्ये दर्शविल्याप्रमाणे मूळ वेतनाच्या टप्प्यानुसार ' अनुज्ञाप्ती शुल्काची' रक्कम माहे मे २००७ पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करून देणे.

**दोन)** सदर संबधित कर्मचा-यांना 'अनुज्ञाप्ती शुल्कापोटी' प्रकरणपरत्वे 'प्रोत्साहन भत्ता' लागू केल्याच्या तारखेपासून ते माहे एप्रिल २००७ पर्यंतची थकबाकी देणे.

**तीन)** गडचिरोली मंडल आणि त्या मंडलाच्या अखत्यारितील सर्व कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना अगोदरपासून देय करण्यात आलेल्या 'अनुज्ञाप्ती शुल्कासाठी' कार्योत्तर मंजुरी देणे. तसेच तेथील कर्मचा-यांना सदर 'अनुज्ञाप्ती शुल्क' यापुढेही पूरकपत्र 'ब' मधील दरानुसार वेतनात समाविष्ट करून देणे.

**चार)** नाशिक परिमंडलाच्या नाशिक जिल्ह्यातील नाशिक तालुका आणि कळवण तालुका या दोनही तालुक्यांतर्गत मुख्यालय असलेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना दि. ६/८/२००२ पासून १५% दराने 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करणे व 'प्रोत्साहन भत्त्याची' रक्कम माहे मे २००७ च्या वेतनात समाविष्ट करून त्यासबंधीची माहे एप्रिल २००७ पर्यंतची थकबाकी देणे.

**पाच)** प्रशासकीय परिपत्रक क्र.७६ दि.२०/९/२००६ अन्वये दि. ९/११/२००५ पासून 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू केलेल्या अमरावती जिल्ह्यातील 'धारणी', ठाणे जिल्ह्यातील 'जव्हार' व 'डहाणू' आणि नंदूरबार जिल्ह्यातील 'तळोदा' या तालुक्यांतर्गत मुख्यालय असलेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना दि. ६/८/२००२ ते दि.८/११/२००५ पर्यंतच्या ३९ महिन्यांची थकबाकी देणे.

३. उपरोल्लेखित खंड (चार) अनुसार द्यावयाचा 'प्रोत्साहन भत्ता' संबंधित कर्मचा-यांच्या मूळ वेतनाच्या १५% दराने परंतु किमान २००/- व कमाल रु. १५००/- यापैकी कमी असलेल्या रकमे इतका देय होईल.

४. 'अनुज्ञाप्ती शुल्क' व 'प्रोत्साहन भत्ता' यांची प्रकरणपरत्वे थकबाकी द्यावयाचा कालावधी याबाबतची जिल्हानिहाय/तालुकानिहाय सविस्तर माहिती दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे. (पूरकपत्र -'अ' आणि 'क' )

५. पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचनेमुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे दुस-या कोणत्याही कार्यालयामध्ये पदस्थापना झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांना विशिष्ट कालावधीकरिता लागू करावयाचे 'अनुज्ञाप्ती शुल्क'/ 'प्रोत्साहन भत्ता'/'त्या संबंधीची थकबाकी' देय करणेबाबत संबंधित कार्यालयांनी परस्परांशी थेट संपर्क साधावा.

६. ज्या कार्यालयांनी 'अनुज्ञाप्ती शुल्काची' रक्कम त्यांच्या अखत्यारितील कर्मचा-यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७८, दिनांक २९/१/२००३ च्या आधारे या पूर्वीपासूनच देय करण्यास सुरूवात केली आहे, त्यांनी 'पूरकपत्र -ब' मधील वेतन टप्प्यानुसार देय केली आहे किंवा कसे याबाबत संबंधित कर्मचा-यांच्या बाबतीत सुरवातीच्या तारखेपासून पडताळणी करावी आणि रक्कम जास्त दिली असल्यास अतिरिक्त रकमेची वसुली करावी किंवा कमी दिली असल्यास देय असलेल्या जादा रकमेची थकबाकी अदा करावी.

७. सदर प्रशासकीय परिपत्रकांन्वये मंजूर करण्यात आलेले 'अनुज्ञाप्ती शुल्क' आणि 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' महाराष्ट्र शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होई पर्यंत अनुज्ञेय रहातील.

८. संबंधित कार्यालयांनी थकबाकीची रक्कम अदा करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून घेण्यासाठी सहमुख्य लेखा अधिकारी अर्थोपाय विभाग निगम कार्यालय, मुंबई यांचेकडे थेट संपर्क साधावा.

९. संबंधित मुख्य अभियंता यांनी त्यांच्या अखत्यारित कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना, प्रकरणपरत्वे अनुज्ञाप्ती शुल्क व प्रोत्साहन भत्ता लागू करावयाची रक्कम व त्यापोटी अदा करण्यात आलेल्या थकबाकीची प्रत्यक्ष रक्कम याबाबतची संपूर्ण परिमंडलाची संकलित केलेली माहिती अधीक्षक अभियंता (वीज दर नियामक कक्ष) यांना दि.३०.६.२००७ पूर्वी थेट कळवावी.

सोबत : पूरकपत्र - अ,ब आणि क

*(सु.य.पाटील)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
१) महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीकरिता :-

१) सह मुख्य लेखा अधिकारी अर्थोपाय विभाग, हॉंगकॉंग, बॅंक इमारत, मुंबई.

२) अधीक्षक अभियंता (वीज दर नियामक कक्ष), प्रकाशगड, बांद्रा,मुंबई .

- सोबत मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांनी सुचविलेल्या व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेल्या टिप्पणीची प्रत जोडली आहे. सदर टिप्पणीत आदेशिल्याप्रमाणे नक्षलग्रस्त घोषित केलेल्या जिल्ह्याच्या/तालुक्याच्या/गावाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीतील कर्मचारी व अधिकारी यांना अनुज्ञाप्ती शुल्क/प्रोत्साहन भत्ता/इतर सवलती व थकबाकी प्रकरणपरत्वे द्यावयाच्या आहेत. त्यापोटी अदा करावयाची थकबाकीची अंदाजे रक्कम रु.५.८० कोटी इतकी येत असून, नक्षलग्रस्त/अतिसंवेदनशील भागातील कर्मचा-यांना द्यावयाच्या अनुज्ञाप्ती शुल्कापोटी/प्रोत्साहन भत्त्यापोटी प्रतिवर्षी सुमारे रु.९४.६५ लाख इतका आर्थिक भार अपेक्षित आहे. त्यासाठीच्या प्रस्तावास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

उपरोक्त मंजुरीनुसार अनुज्ञाप्ती शुल्क व प्रोत्साहन भत्ता द्यावयाच्या थकबाकीची अंदाजे रु.६.७४ कोटी इतक्या रकमेची वित्तीय तरतूद करण्यात आली नसल्याने या रकमेची तरतूद इंधन समायोजन आकार (FOCA) अंतर्गत करण्याची आवश्यकता आहे. सबब, अधीक्षक अभियंता (वीज दर नियामक कक्ष) यांना विनंती की त्यांनी मुख्य अभियंता, नागपूर, अमरावती, कल्याण, लातूर व नाशिक परिमंडल यांचेकडून परिच्छेद क्र.९ मध्ये नमूद केल्यानुसार प्राप्त झालेली प्रत्यक्ष वित्तीय भाराची माहिती संकलित करुन सदर रकमेसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे प्रस्ताव सादर करुन मंजुरी प्राप्त करून घ्यावी.

*K/Adm.Cir.- F.N.664*
*18/5/07*

**पूरकपत्र - 'अ'**

## 'अनुज्ञाप्ती शुल्काची' थकबाकी द्यावयाचा कालावधी दर्शविणारे विवरणपत्र

| अक्र | परिमंडलाचे व जिल्हयाचे नाव | प्रोत्साहन भत्ता लागू केलेल्या तालुक्याचे गावाचे नाव | प्रोत्साहन भत्ता देय करण्यासाठी मंजुरी कळविल्याचे पत्र/ प्रशासकीय परिपत्रक क्र. व दिनांक | प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आलेली तारीख | थकबाकी द्यावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | **नागपूर परिमंडल**<br>जिल्हा गडचिरोली | संपूर्ण जिल्हा | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | प्रश्न उद्भवत नाही. |
| २. | जिल्हा चंद्रपूर | चंद्रपूर, गोंडपिंपरी राजुरा व कोरपना | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ३. | जिल्हा चंद्रपूर | जिवती, बल्लारशा (बल्लारपूर), पोभूर्णा मूल व सावली | पत्र क्र.७५४<br>१८.३.२००५<br>पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ७.१२.२००४ | ७.१२.०४ ते ३०.४.०७ (२९ महिने) |
| ४. | जिल्हा गोंदिया | तिरोरा,गोरेगाव,सडक अजुनी,सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव हे तालुके व आमगाव पोलीस स्टेशन अंतर्गत भाग | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ५. | जिल्हा गोंदिया | गोंदिया तालुका | प्रशा.परि.क्र.३७<br>१९.०४.२००६ | २०.५.२००५ | २०.५.०५ ते ३०.४.०७ (२३ महिने) |
| ६. | जिल्हा भंडारा | लाखणी, लाखांदूर | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ७.१२.२००४ | ७.१२.०४ ते ३०.४.०७ (२९ महिने) |
| ७. | जिल्हा भंडारा | साकोली | पत्र क्र.७५४<br>१८.०३.२००५<br>पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ८. | **अमरावती परिमंडल**<br>जिल्हा यवतमाळ | पांढरकवडा, वणी | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ९. | जिल्हा यवतमाळ | झरीजामणी, घाटजी, आर्णी | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ७.१२.२००४ | ७.१२.०४ ते ३०.४.०७ (२९ महिने) |
| १०. | जिल्हा अमरावती | धारणी | प्रशा.परि.क्र.७६<br>२०.०९.२००६ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ११. | **लातूर परिमंडल**<br>जिल्हा नांदेड | किनवट | पत्र क्र.३३५९२<br>१८.१०.२००५ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| १२. | **कल्याण परिमंडल**<br>जिल्हा ठाणे | जव्हार, डहाणू | प्रशा.परि.क्र.७६<br>२०.०९.२००६ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| १३. | **नाशिक परिमंडल**<br>जिल्हा नंदूरबार | तळोदा | प्रशा.परि.क्र.७६<br>२०.०९.२००६ | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| १४ | जिल्हा नाशिक | नाशिक | प्रशा.परि.क्र. | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| १५ | जिल्हा नाशिक | कळवण | प्रशा.परि.क्र. | ६.८.२००२ | ६.८.०२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |

**पुरकपत्र - 'ब'**

## मूळ वेतनाच्या टप्प्यानुसार द्यावयाच्या 'अनुज्ञाप्ती शुल्काची' रक्कम दर्शविणारे विवरणपत्र

| मुळ वेतनाचा टप्पा (Slab of drawing basic pay) | अनुज्ञाप्ती शुल्काचे दर (Rate of Anudnyapti Shulka) |
|---|---|
| रु.३७२०/- ते ६५००/- | रु.१३०/- |
| रु.६५०१ ते ८०००/- | रु.२२०/- |
| रु.८००१ ते ९७००/- | रु.२९०/- |
| रु.९७०१ ते १४३००/- | रु.४६०/- |
| रु.१४३०१ व त्याहून अधिक | रु.७००/- |

---

**पुरकपत्र - 'क'**

## 'प्रोत्साहन भत्त्याची' थकबाकी द्यावयाचा कालावधी दर्शविणारे विवरणपत्र

| अक्र | परिमंडलाचे व जिल्हयाचे नाव | प्रोत्साहन भत्ता लागू केलेल्या तालुक्याचे / गावाचे नाव | शासन निर्णयाची तारीख | प्रोत्साहन भत्ता देय करण्यासाठी मंजुरी कळविल्याचे पत्र/ प्रशासकीय परिपत्रक क्र. व दिनांक | प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आलेली तारीख | थकबाकी द्यावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | **नाशिक परिमंडल** जिल्हा नंदूरबार | तळोदा | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.७६ दि.२०/९/०६ | पूर्वीची तारीख ९.११.०५ सुधारित तारीख ६.८.०२ | ६.८.२००२ ते ८.११.०२ (३९ महिने) |
| २ | **कल्याण परिमंडल** जिल्हा ठाणे | जव्हार | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.७६ दि.२०/९/०६ | पूर्वीची तारीख ९.११.०५ सुधारित तारीख ६.८.०२ | ८.८.२००२ ते ८.११.०५ (३९ महिने) |
| | जिल्हा ठाणे | डहाणू | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.७६ दि.२०/९/०६ | पूर्वीची तारीख ९.११.०५ सुधारित तारीख ६.८.०२ | ६.८.२००२ ते ८.११.०५ (३९ महिने) |
| ३. | **अमरावती परिमंडल** अकोला जिल्हा अमरावती | धारणी | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.७६ दि.२०/९/०६ | पूर्वीची तारीख ९.११.०५ सुधारित तारीख ६.८.०२ | ६.८.२००२ ते ८.११.०५ (३९ महिने) |
| ४ | **नाशिक परिमंडल** जिल्हा नाशिक | नाशिक | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.१०७ दि.१५/५/०७ | ६/८/०२ | ६.८.२००२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |
| ५ | जिल्हा नाशिक | कळवण | आदिवासी विभाग ९/११/२००५ | प्रशा.परि.क्र.१०७ दि.१५/५/०७ | ६/८/०२ | ६.८.२००२ ते ३०.४.०७ (५७ महिने) |